# बीडच्या शिक्षण विभागात बोगस शिक्षक आणि कर्मचारी भरतीत ५०० कोटींचा घोटाळा!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




**जिल्ह्यात जेवढा काही चारशे पाचशे कोटींचा घोटाळा झाला आहे त्याची चौकशी झाल्यास शिंदे, फुलारी आणि संस्थाचालक यांना जेलची हवा खावी लागण्याची शक्यता?**


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २४२ ■ बुधवार दि.२१ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 242 ■ Wednesday Dt.21 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# बीड जिल्ह्यात कोणतीही संस्था असो एक नाना नावाचा व्यक्ती सगळ्यांचं गुत्त घेतो आणि खालपासून ते वरपर्यंत यंत्रणा मॅनेज करतो?

## त्याच्या वाटेत जो कोणी येईल, त्याला साम दाम दंड भेद या माध्यमातून गप्प करण्याचा प्रयत्न हा नाना करतो?

## शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे आणि भगवान फुलारी या दोघांनी चारशे ते पाचशे कोटी रुपयांचा केला घोटाळा?

**बकरे की माँ कब तक दुवा मांगेगी, या पद्धतीने बीडच्या दोन्ही शिक्षणाधिकाऱ्यांनी केला नंगानाच?**

**काही संस्था चालकांनी उपसंचालक कार्यालयापासून ते मंत्रालयापर्यंत फीडिंग लावली?**

**फुलारी, शिंदेंनी मागील तारखेतील रजिस्टर वापरून त्या त्या काळातील शिक्षणाधिकाऱ्यांच्या सह्या मॅनेज केल्या?**

**अंधारात केलेलं पाप एक ना एक दिवस उजेडात येतच; त्याचप्रमाणे शिक्षक भरतीत झाला घोटाळा?**

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात २०१२ ते २०१९ आणि गेल्या तीन वर्षात देखील मोठ्या प्रमाणात बोगस शिक्षक आणि कर्मचारी भरती करण्यात आली. काही संस्थाचालकांनी उपसंचालक कार्यालयापासून ते मंत्रालय पर्यंत फिल्डिंग लावली. मात्र बकरे कि माँ कब तक दुवा मांगेगी या पद्धतीने बीडच्या दोन्ही शिक्षणाधिकारी यांनी जो काही नंगानाच केला आहे तो उघडकीस आला आहे. नागनाथ शिंदे आणि भगवान फुलारी या दोघांनी चारशे ते पाचशे कोटी कोटी रुपयांचा घोटाळा केला असल्याची तक्रार झाल्यानंतर या प्रकरणी शिक्षण आयुक्त यांनी



चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत या दोघांची बदली करू नये असे म्हटलं आहे. त्यामुळे आता या दोघांसोबत संस्थाचालक यांचे देखील धाबे दनाणले आहेत.

बीड जिल्ह्यात बहुतांश खाजगी शाळांमध्ये २०१२ ते २०१९ या काळात नोकर भरती बंदी मोठ्या प्रमाणात शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती केली. संस्थाचालकांनी या काळात शिक्षक आणि कर्मचारी आपल्या शाळेवर नोकरीस असल्याचे खोटे कागदपत्र तयार करून २०१९ ते २०२४ या काळात मोठ्या प्रमाणात भरती केली. बीडचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक चे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी मागील तारखेतील रजिस्टर वापरून त्या त्या काळातील शिक्षणाधिकारी यांच्या सह्या मॅनेज केल्या. जिल्ह्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित असो कि डाव्या विचाराशी संबंधित सगळ्याच संस्थांना शेकडो शिक्षक आणि कर्मचारी भरती करणाऱ्यासाठी अर्थपूर्ण मदत केली. याबाबत गेल्या

पान २ वर



"बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी शिक्षक भरती घोटाळा प्रकरणात तक्रार दिली असल्याने तक्रार परत घेण्यासाठी माझ्यावर खोटे गुन्हे दाखल करून व तक्रार परत घेण्यासाठी दबाव तंत्राचा वापर करत असल्याने व माझ्या जिवीतास शिक्षणाधिकारी भगवान फुलारी व ज्या खाजगी संस्थेमध्ये बोगस शिक्षक भरती करण्यात आली या संबंधिताकडून माझ्या जिवीतास धोका निर्माण झाला असून. मला जिवे मारण्याची सुपारी सुध्दा शिक्षक भरती प्रक्रियेतील अधिकारी, कर्मचारी व संस्था चालक यांनी दिली असल्याची गोपनीय माहिती मला मिळाली आहे. तसेच माझ्या जिवीताचे काही बरेवाईट झाल्यास शिक्षणाधिकारी भगवान फुलारी व ज्या खाजगी संस्थेमध्ये बोगस भरती करण्यात आली आहे त्या-त्या संस्थेचे संस्थाचालक हे जबाबदार राहतील.

**- इंजि. सादेक बाबामियाँ इनामदार**
मराठवाडा अध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य

### चौकशी होईपर्यंत संबंधितांची इतरत्र कुठेही बदली करण्यात येऊ नये?

बीड जिल्हा परिषदेतील शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी (प्राथ.) भगवान फुलारी व शिक्षणाधिकारी (माध्य) मागनाथ शिंदे हे रूजू झाल्यापासून शिक्षण विभागामध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू आहेत, यामध्ये खाजगी शिक्षण संस्था व अल्पसंख्यांक शिक्षण संस्था अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शासनाचे सर्व नियम डावलून संस्था चालकांकडुन आर्थिक देवाण घेवाण करून शिक्षक पदभरती करणे तसेच शिक्षकांना कायम मान्यता देणे अशा प्रकारची बेकायदेशीर कामे करून करोडो रूपयांचा भ्रष्टाचर केलेला असल्याबाचन शासनास तक्रार दाखल केली असून याप्रकरणाची चौकशी होत नाही, तोपर्यंत सदर अधिकारी यांना अन्यत्र बदली करू नये अशी मागणी होत आहे.

## चहा पिण्याच्या बहाण्याने अपहरण

बीड । प्रतिनिधी

ओळखीच्याच एकाने चहा पाजतो, असा बहाणा करून दुचाकीवरून दुर नेले. तेथे पाच ते सहा जणांनी दारू पाजली. नंतर वाहनातून अपहरण करून सात तास बेदम मारहाण केली. यात जखमीच्या डोक्यात सात टाके पडले असून अंगावर सर्वत्र वण उमटले आहेत. हा प्रकार १८ मे रोजी सायंकाळी ६ वाजता घडला. यातील जखमीवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही.

आप्पा काशिनाथ राठोड (वय ४५ रा. जीवणापुर ता. माजलगाव) असे जखमीचे नाव आहे. आप्पा हे गोरसेना संघटनेत सक्रीय आहेत. ते समनक संघटनेचेही पदाधिकारी आहेत. परंतू गावातीलच रमेश पवार नामक व्यक्तीने भाजपसोबत हात मिळवणी केल्याने त्याला पद देण्यास आप्पा यांनी विरोध केला. याचा राग मनात धरून ओळखीच्या दोन लोकांना पाठवून आप्पा हे पात्रूडवरून गावी जात असताना चहा पाजतो, असे सांगून दुचाकीवर बसवले. तेलगाव रोडवरील टालेवाडी फाटा येथे नेले. तेथे रमेश पवार व इतर पाच ते सहा लोक आधीच थांबले होते. तेथे आप्पाला दारू पाजली. त्यानंतर डोक्यात दांड्याने मारहाण केली. तेथून चारचाकी वाहनातून अपहरण करून पात्रूड, माजलगाव एमआयडीसी आदी भागात पहाटे तीन पर्यंत फिरवले. जवळपास सात तास त्यांना बेदम मारहाण केली. यामध्ये आप्पा यांचे डोके फुटले, शिवाय अंगावरही सर्वत्र वण आहेत. मारहाणीमुळे पाठ काळीनिळी झाली होती. सध्या त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## श्रावण बाळ व संजय गांधी योजनेंतर्गत निराधार लाभार्थ्यांना अनुदान द्या : मानवलोकची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्रावण बाळ व संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांना बँकेकडून अनुदान मिळत नाही, श्रावण बाळ आणि संजय गांधी योजनेंतर्गत हजारो निराधार लाभार्थ्यांना मागील काही महिन्यांपासून अनुदानाची रक्कम बँकेमार्फत मिळत नाही. यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. यासंदर्भात मानवलोकच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले

त्यात केवायसी व व्हेरिफिकेशन पूर्ण असूनही अनुदान नाही अनेक लाभार्थ्यांनी सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या असूनही त्यांच्या खात्यावर अनुदान जमा झालेले नाही. तहसील व बँक दरम्यान लाभार्थ्यांची हेलपाटे तहसील व बँक दोघेही



एकमेकांकडे पाठवतात. वयोवृद्ध व आजारी लाभार्थ्यांना या प्रक्रियेत खूप त्रास सहन करावा लागतो. तहसीलमध्ये केवळ दोन कर्मचारी असल्यामुळे दररोज मोठ्या संख्येने लाभार्थ्यांची गर्दी होते. कृपया तात्पुरते दहा कर्मचारी नियुक्त करावेत. सर्व राष्ट्रीयकृत बँकांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन, डीबीटी व केवायसी प्रक्रियेसाठी योग्य सूचना द्याव्यात.

बँक ऑफ महाराष्ट्र खाते अडचणी अनेकांचे खाते बंद सांगून पोस्ट बँकेत खाते उघडण्यास सांगितले जाते. यावर उपाययोजना करावी. कार्यालयीन वेळेआधी काम सुरू करावे. सकाळी नऊ वाजल्यापासून व्हेरिफिकेशन सुरू करावे, जेणेकरून काम लवकर पूर्ण होईल. तहसील कार्यालय परिसरात पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी. अर्धांगवायू, दृष्टीदोष, आधार नसलेले किंवा अंगठ्याचे ठसे न उमटणारे लाभार्थी यांची नोंद घेऊन त्यांना प्रक्रिया वगळून अनुदान द्यावे. लाभार्थ्यांना आधार व माहिती द्यावी अनेक लाभार्थ्यांना वाटते की त्यांचे अनुदान बंद झाले आहे. त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांना योग्य माहिती व मानसिक आधार द्यावा.

वरील सर्व मागण्यांचा गांभीर्याने विचार करून त्वरीत कार्यवाही करावी असे

पान २ वर

## अजिंठा घाटात दोन ट्रकचा भीषण अपघात

### एक ट्रक २०० फूट दरीत कोसळला

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा घाटात दोन ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. त्यातील एक ट्रक २०० फूट खाली दरीमध्ये कोसळला आहे. या अपघात २ जण जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अजिंठा घाटात दोन ट्रकमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली. त्यानंतर यातील एक ट्रक २०० फूट दरीत कोसळला असल्याची माहिती




मिळत आहे. दरम्यान, यामध्ये २ जण जखमी झाले आहेत. सुदैवाने कोणतीही जीवितहाणी झाली नाही. दरम्यान, या दोन ट्रकचा नेमका अपघात कसा झाला? यामध्ये कोणाची चूक होती? याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही.

## वळवाच्या पावसात आतापर्यंत २७ जणांचा मृत्यू; वीज अटकाव यंत्राचे व्यस्त प्रमाण

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

वळवाच्या पावसामुळे मराठवाड्यात आतापर्यंत २७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, ३९२ जनावरे दगावली आहेत. मराठवाड्यात वीज पडण्याचे प्रमाण अधिक असल्याने वीज अटकाव करणारी यंत्रे वाढवावीत, अशा सूचना मान्सूनपूर्व बैठकीत करण्यात आल्या आहेत. मराठवाड्यात ५०३ वीज अटकाव यंत्रे आहेत. त्यातील सर्वाधिक ३०८ एकट्या बीड जिल्ह्यात आहेत. आतापर्यंत मृत व्यक्तींची संख्याही बीडमध्येच सर्वाधिक आहे. अन्य सात जिल्ह्यांत १९५ वीज यंत्रे



आहेत

विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सोमवारी घेतलेल्या मान्सूनपूर्व आढावा बैठकीमध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये ७५, जालना व लातूर जिल्ह्यात प्रत्येकी तीन, धाराशिव आणि परभणी जिल्ह्यात प्रत्येकी चार एवढीच वीज अटकाव यंत्रे आहेत.यातील परभणी जिल्ह्यातील सर्व यंत्रे नादुरुस्त अवस्थेत असल्याची माहिती या बैठकीमध्ये देण्यात आली. गेल्या दहा दिवसांपासून मराठवाड्यात पावसामुळे मृत्यूचे प्रमाण वाढले असून, मे महिन्यात वीज पडून मृत्यू होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले आहे. एका वीज अटकाव यंत्राची किंमत पाच हजार रुपयांपेक्षाही कमी आहे. जर

पान २ वर

### बीड जिल्ह्यासाठी खतपुरवठ्यात सुरळीतपणा हवा

बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा या तालुक्यांतील खत वितरणासाठी अहिल्यानगरहून आरक्षित साठा मिळावा. हा साठा अन्य कोणी तरी उचलतो. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड, सोयगाव या तालुक्यांसाठी जळगाव जिल्ह्यातील पाचोरा हा थांबा आहे. मात्र, तेथून खते उपलब्ध होत नाहीत. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यासाठी जालना येथून खतसाठा आरक्षित करण्याची गरज आहे. हे होत नसल्याने वाहतूक खर्च वाढतो, असे मत जिल्हा कृषी अधीक्षक डॉ. प्रकाश देशमुख यांनी व्यक्त केले.

# आकाशात वीज चमकत असताना नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारी

बीड । प्रतिनिधी

हंगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या विविध भागात वीज चमकण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. वीज कोसळणे ही एक गंभीर नैसर्गिक आपत्ती असून नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व नागरिकांना खालील खबरदारीचे उपाय काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.



विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर राहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. या गोष्टी करू नका.

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली आंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाईन यांना स्पर्श करू नका.

तसेच कुठल्याही विद्युत उपकरणाचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या साह्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडांच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे राहू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारात अथवा खिडकीतून वीज पडताना बाहेर पाहू नका व बाहेर थांबणे तितकेच धोकादायक आहे.

उपयोगी मोबाईल प्सची माहिती,

दामिनी ॲप – हे ॲप भारतीय हवामान विभागाने विकसित केले असून विजेच्या गडगडाट आणि संभाव्य ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेवर मिळवून देण्याचा उद्देश आहे. हे ॲप आपल्या स्थानाच्या २० किमी परिसरात वीज कोसळण्याची शक्यता असल्यास तात्काळ अलर्ट पाठवते. वापरण्यास अगदी सोपे असून मराठीसह विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे. Google Play Store Am{U Apple App Store वर हे ॲप मोफत उपलब्ध आहे.

सचेत ॲप – हे ॲप आपत्ती व्यवस्थापन विभागाने विकसित केले असून भूकंप, पूर, वीज चमकणे, वादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या अलर्टस पुरवते. स्थानिक हवामान आणि संभाव्य आपत्तींची अचूक माहिती, सजगता आणि मार्गदर्शन यातून मिळते. या पच्या साह्याने नागरिक वेळेत सुरक्षिततेचे पावले उचलू शकतात. Play Store आणि App Store वर मोफत उपलब्ध आहे.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील खबरदारीचे उपाय वेळेवर आणि शिस्तबद्धपणे पाळावेत. प्रशासन आपत्ती व्यवस्थापनासाठी सदैव सज्ज असून नागरिकांनी देखील सजग राहणे गरजेचे आहे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.

# संजीवनी फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक अमोल जवणे उत्कृष्ट बी.सी. पुरस्काराने सन्मानित

आष्टी । प्रतिनिधी



स्टेट बँक ग्राहक सेवा केंद्रांतर्गत राबविलेल्या सर्व योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व संजीवनी फाउंडेशनच्या सीएससी केंद्राकडून करून घेतल्याबद्दल संजीवनी फाउंडेशन चे जिल्हा समन्वयक अमोल नारायणराव जवणे हे प्लॅटिनम पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

संभाजीनगर येथील विभागीय कार्यालयातर्फे आयोजित फास्टेस्ट फिफ्टी एप्रिल २०२५ कम्पेन अंतर्गत श्री.अमोल नारायणराव जवने यांचा उत्कृष्ट बी.सी. प्लॅटिनम प्रवर्ग म्हणून डी.जी.एम. चंद्रशेखर राच्या, विभागीय कार्यालय यांचे हस्ते पुरस्कार प्रदान केला तसेच छ. संभाजी नगर, अतुल सावजी मुख्य प्रबंधक (वि.स), अमोल चावरे, प्रबंधक (वि. स.) अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालय हे पण कार्यक्रमाला मार्गदर्शन केले. सामाजिक सुरक्षा योजना जसे अटल पेन्शन योजना, प्रधान मंत्री जीवन सुरक्षा, जीवन ज्योती योजना अशा अनेक योजना अनेक वर्षा पासून घराघरात पोहोचवल्या आणि त्यांना लाभ मिळवून तसेच अनेक ग्राहक सेवा केंद्राचे वाटप करून त्याचा मोठा वटवृक्ष केला, याबाबत अमोल जवने यांचे भरभरून कौतुक करण्यात आले. यांच्या काम तथा योगदानापासून उड्झ नी प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन अमोल चावरे, प्रबंधक (वि.स.) यांनी केले.

देशातील बहुतेक गावात राष्ट्रीयकृत बँक नसल्याने नागरिकांना बँकिंग सेवा मिळण्यासाठी दूरवर जावे लागत आहे म्हणून आपल्याच गावात त्वरित बँकिंग सेवा मिळावी बेरोजगारांना काम मिळावे नागरिकांचा वेळ वाचवा व आपले रोजचे काम न नडता व्यवहार करता यावा हाच ग्राहक सेवा केंद्राचा मुख्य उद्देश आहे. नोकरीच्या संधी खूप कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने युवकांनी नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा व्यवसाय सुरू करून आपले उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत त्यासाठी स्टेट बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राचा एक चांगला पर्याय उपलब्ध असून या संधीचा फायदा घ्यावा. जिल्ह्यातील आतापर्यंत सर्वाधिक ग्राहक सेवा केंद्र असून पुढील काळात एक गाव एक ग्राहक सेवा केंद्र हे उद्दिष्ट डोळ्यासमोर आहे. अधिक माहितीसाठी साई एजन्सी (९२२६०९५९४८) प्लॉट नंबर १६ अंकुर आपारमेंट दुर्गा माता मंदिराजवळ, रासने नगर, सावेडी अहिल्यानगर येथे संपर्क साधावा असे जिल्हा समन्वयक अमोल जवणे यांनी सांगितले.

# पात्रुड येथील सरपंच नौशाद लतीफ मोमीन यांना लोकमत समूहाच्या वतीने आदर्श पुरस्कार प्रधान

पात्रुड । प्रतिनिधी

बीड येथे नुकत्याच पार पडलेल्या लोकमत व बीकेटी टायर्स यांच्या वतीने लोकमत सरपंच अवार्ड २०२५ चे वितरण शनिवार दि. १७ मे २०२५ रोजी सौभाग्य मंगल कार्यालय बीड येथे मोठ्या थाटात करण्यात आले यावेळी माजलगाव तालुक्यातील पात्रुड गावचे सरपंच नौशाद लतीफ मोमीन यांना जिल्हा अधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधिकक्ष नवनीत कॉवत, आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील, बीकेटी टायर्स मराठवाडा डिस्ट्रीब्यूटर प्राजक्ता अग्रवाल, यांच्या हस्ते लोकमत सरपंच अवार्ड प्रधान करण्यात आला.



या अनुषंगाने पात्रुड चे माजी सरपंच एकनाथ मस्के व सर्व गावकऱ्यांच्या वतीने मोठ्या थाटामाटात सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता कार्यक्रमाचे प्रस्ताविक एन डी एम न्यूज चे संपादक धैर्यशील ढगे यांनी केले तर माजी सरपंच एकनाथ मस्के यांनी गावकऱ्यांना संबोधित केले. याप्रसंगी उपसरपंच घनश्याम भुतडा, प्रमुख पाहुणे म्हणून दै. लोकमतचे तालुका प्रतिनिधी पुरुषोत्तम करवा, ग्रामपंचायत सदस्य अरुण जंगले, नवनाथ चाळक, भानुप्रताप भुजबळ, दीपकराव शिंदे, इत्तेखार पटेल, अरुण जोगदंड, पापा घाडगे, सतीश काशीद, आसाराम यादव, फजलू पटेल, विलास मोरे, विलास अलझेंडे, व गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते ह्या कार्यक्रमाचे नियोजन ग्रामपंचायत कर्मचारी शिवाजी गोमळे व त्यांच्या सहकार्याने केले. तर दै. माजलगाव टाइम्स चे पत्रकार प्रकाश यादव यांनी उपस्थितितांचे आभार मानले.

# काँग्रेसच्या वतीने बीडमध्ये तिरंगा रॅली संपन्न

## मोटार सायकल रॅली काढून सैनिकांच्या प्रति काँग्रेसने दाखवली सद्भावना

बीड । प्रतिनिधी

पाकिस्तानच्या सततच्या भ्याड हल्ल्याला भारतीय सैन्याने मोठ्या ताकतीने उत्तर देत पाकिस्तानला चार दिवसांत गुडघे टेकायला लावले व भारतीय सैन्याने मिळवलेला हा विजय केवळ सैन्याचा आहे म्हणून भारतीय सैन्याला सलाम करण्यासाठी व भारतीयांची असलेली संवेदना हिच खरी देशभक्ती असून या वीरांच्या पराक्रमाला वंदन करण्यासाठीच काँग्रेस पक्षाच्या वतीने तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते.

बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून या रॅलीची सुरुवात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हाधिकारी कार्यालय समोरून जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यालयात शहीद जवानाच्या प्रति संवेदना व केलेल्या शौर्याला सलाम व्यक्त करत या रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेदरे, परवेज कुरेशी, संभाजी जाधव, गणेश राउत, विष्णू मस्के, प्रकाश मुंडे, पांडुरंग मस्के, दादासाहेब तासतोडे, राहुल जाधव, ड. विशाल मस्के, रमधन जमाले, मोसिन शेख, गणेश जवकर, कल्याण टेकाळे, हनुमंत घोडके, शेख कादर बाबा, उत्तरेश्वर जाधव, बबलू भाई शेख, रोहित नवले, राम शेळके, हरिभाऊ सावंत, पांडुरंग हराळे, सखाराम बेंडगे, रंजीत शेळके, अमजत कुरेश, शेख मुस्ताक, बाळू गिराम यांच्यासह या रॅलीत बीड शहर मंचचे नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, अड. नितीन वाघमारे यांनी देखील उपस्थित राहून भारतीय सैनिकांप्रती आपल्या संवेदना दर्शवल्या.

**स्व. राजीव गांधी यांना अभिवादन...!**

आज भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व राजीव गांधी यांचा स्मृतिदिन असल्याने जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



पान १ वरून...

## बीड जिल्ह्यात कोणतीही संस्था असो एक नाना नावाचा व्यक्ती...

वर्षभरापासून अनेक तक्रारदार व सामाजिक कार्यकर्त्यांनी पाठपुरावा केला. त्यानंतर अनेक संस्थाचालक यांनी संभाजीनगर चे उपसंचालक यांच्यापासून ते मंत्रालय पर्यंत यंत्रणा मॅनेज करण्याचा प्रयत्न केला.

मात्र अंधारात केलेलं पाप एक ना एक दिवस उजेडात येतच असं म्हणतात, त्याप्रमाणे बीडमध्ये जो काही शिक्षक भरती घोटाळा झाला आहे त्याची तक्रार शासनाकडे झाली. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्त यांना पत्र पाठवून प्राथमिक चे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी आणि माध्यमिक चे नागनाथ शिंदे यांनी केलेल्या चारशे ते पाचशे कोटीच्या घोटाळ्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत या दोघांची बीडमधून इतरत्र कोठेही बदली करू नये असे म्हटलं आहे. आता आयुक्त कार्यालयाकडून याबाबत चौकशीसाठी पथक पाठवण्यात येणार आहे. त्यानंतर फुलारी आणि शिंदे यांच्यासहित ज्या ज्या संस्थाचालक यांनी काळे धंदे केले आहेत त्यांच्यावर कारवाई होणार हे नक्की झाले आहे. बीड जिल्ह्यात कोणतीही संस्था असो एक नाना नावाचा व्यक्ती सगळ्यांचं गुत्त घेतो आणि खालपासून ते वरपर्यंत यंत्रणा मॅनेज करून बोगस शिक्षक भरती करतो, या माध्यमातून त्याने गेल्या काही वर्षात गडगन्ज संपत्ती जमा केली आहे. त्याच्या वाटेत जो कोणी येईल त्याला साम, दाम, दंड, भेद या माध्यमातून गप्प करण्याचा प्रयत्न हा नाना करतो. बीड जिल्ह्यात जेवढा काही चारशे पाचशे कोटींचा घोटाळा झाला आहे त्याची चौकशी झाल्यास शिंदे, फुलारी आणि संस्थाचालक यांच्यासोबत नोकरीस लागलेले बोगस शिक्षक आणि कर्मचारी यांना देखील जेलची हवा खावी लागण्याची शक्यता आहे.

## वळवाच्या पावसात आतापर्यंत २७ जणांचा मृत्यू

वीज पडून मृत्यू कमी करायचे असतील, तर ही यंत्रे वाढवावी लागतील, अशी मागणी केली जात आहे. याशिवाय 'दामिनी' आणि 'सचेत' हे दोन 'प' मोबाइलमध्ये घेतल्यास वीज पडू शकते की नाही, याचा अंदाज मिळू शकतो, असे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, मराठवाड्यातील १४ प्रमुख नद्यांवर आठ जिल्ह्यांतील ६५५ गावे पूरप्रवण असल्याने या गावांत कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, याबाबतही या बैठकीत चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. केवळ मॉन्सूनपूर्व आढावाच नाही, तर राज्यस्तरीय खरीप हंगाम बैठकीमध्येही मराठवाड्यात कोणत्या अडचणी येऊ शकतात, याचा आढावा घेतला जात आहे. कोणतीही मालमत्ता तारण न घेता पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे. पतमानांकन तपासू नये, अशा तोंडी सूचनांबरोबरच त्या बँकांना लेखी स्वरूपात द्याव्यात, प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील प्रलंबित नुकसानभरपाई कंपन्यांनी द्यावी, तसेच रसायनिक खत वितरणातील दोष दूर करण्यासाठी राज्य सरकारने आदेश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे.

## श्रावण बाळ व संजय गांधी योजनेंतर्गत निराधार...

निवेदनात म्हटले आहे. मानवलोकच्या वतीने तहसिलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनावर मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया, श्याम सरवदे, श्रीमती संजना आपेट, श्रीमती सावित्री सागरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तहसिलदार विलास तरंगे यांनी मानवलोक कार्यालयात येऊन महिलांशी संवाद साधला व सर्व बाबींवर चर्चा केली यावेळी पत्रकार प्रशांत बर्दापूरकर, राहूल देशपांडे व इतर उपस्थित होते.

# सय्यद बादशाह : संघर्षमय प्रवासातून पत्रकारितेकडे वाटचाल



सिटी लाईफ या साप्ताहिक वर्तमानपत्राचे युवा सह संपादक सय्यद बादशाह यांचा आज वाढदिवस आहे. सामान्य कुटुंबातून आलेला हा तरुण पत्रकार आपल्या संघर्षमय प्रवासाने, कष्टाळू वृत्तीने आणि अभ्यासपूर्ण दृष्टिकोनाने पत्रकारिता क्षेत्रात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करत आहे. त्यांचा शांत, संयमी आणि नरम–गरम स्वभाव त्यांना सहकाऱ्यांमध्ये आणि समाजात लोकप्रिय बनवतो. सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे सय्यद बादशाह हे मैत्रीला जपणारे मित्र आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.

सय्यद बादशाह यांनी लॅब टेक्निशियनपर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात राजकारणातून केली. २०११ मध्ये सर्जेराव तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राजकारणात प्रवेश केला. २०१३ मध्ये माजी मंत्री बदामराव पंडित यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आणले आणि राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या तालुका सरचिटणीसपदी निवड केली. या अनुभवाने त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित झाले. यानंतर त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात पाऊल टाकले. दैनिक बीड प्रसार आणि दैनिक किसान या वृत्तपत्रांमध्ये त्यांनी काम केले. सध्या ते बीड महाराष्ट्र या डिजिटल यूट्यूब चॅनलचे संपादक म्हणून कार्यरत आहेत, जिथे त्यांनी डिजिटल माध्यमातही आपली छाप पाडली आहे. सय्यद यांचा जीवनप्रवास संघर्षांनी भरलेला आहे. गेवराईच्या खक्का मार्केटमध्ये कपड्याचे दुकान चालवणे असो किंवा पाण्याचे जार विकणे असो, त्यांनी प्रत्येक काम मेहनतीने आणि प्रामाणिकपणे केले. या अनुभवांनी त्यांना जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद दिली. त्यांचा शांत आणि संयमी स्वभाव त्यांना सामाजिक कार्यातही वेगळे ठरवतो. समाजातील उपेक्षित घटकांचा आवाज बनण्यासाठी त्यांचे लेखन आणि संपादन प्रभावी ठरले आहे. सामाजिक बदलासाठी ते नेहमीच सक्रिय असतात, मग तो गरजूंना मदत करणे असो किंवा जागरूकता निर्माण करणे असो. सय्यद बादशाह यांचा हा प्रवास नवोदित पत्रकारांसाठी प्रेरणादायी आहे. सामान्य कुटुंबातून येऊनही त्यांनी आपल्या जिद्दीने आणि मेहनतीने पत्रकारितेत यश मिळवले. वाढदिवसाच्या या खास प्रसंगी त्यांना उत्तम आरोग्य, यश आणि समृद्ध भविष्याच्या शुभेच्छा! त्यांचा हा संघर्षमय प्रवास यापुढेही अनेकांना प्रेरणा देत राहील. पुन्हा एकदा त्यांना वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा...!



जुनेद बागवान
मो.९७३००७५३१३

# पळती झाडे पाहूया, मामाच्या गावाला जाऊया!

## उन्हाळी शिबिराकडे पालकांसह चिमुकल्यांची धाव

पात्रुड । प्रतिनिधी

कधी एकदा शाळेला उन्हाळी सुट्या लागतात अन् कधी एकदा मामाच्या गावाला जातोय, याची चिमुकल्यांना लागलेली उत्सुकता आताच्या धावपळीच्या व मोबाइलच्या काळात धूसर होत असल्याची जाणीव होत आहे. 'झुक झुक आगीनगाडी, धुरांच्या रेषा हवेत सोडी, पळती झाडे पाहूया, मामाच्या गावाला जाऊया' ही कविता शाळांना सुट्या लागल्या की मुलांना आठवत होती. मात्र, सध्याच्या स्पर्धेच्या युगात ट्युशन, कोर्सेस अन् उन्हाळी शिबिरे आदींच्या व्यापात 'मामाचा गाव' मात्र परका वाटू लागला आहे. परिणामी मामाचा गाव चिमुकल्यांच्या चिवचिवाटाविना पोरका होत आहे.

१९९०–१९९५ चा एक काळ होता. त्यानंतर मात्र भौतिक सुविधांच्या मागे लागणारे जग आधुनिक कुटुंब व्यवस्थेला व्यापून टाकले. त्यामुळे आपलेपणाची जाणीव कमी होत आहे. या सर्वांमुळे मामाचा गाव मात्र सर्वांसाठी परका होऊ लागला आहे. पूर्वी उन्हाळी सुट्यांच्या काळात लहान मुलांना आपलेपणाची जाणीव कमी होत आहे. या सर्वांमुळे मामाचा गाव मात्र सर्वांसाठी परका होऊ लागला आहे. पूर्वी उन्हाळी सुद्द्यांच्या काळात लहान मुलांना हक्काचे घर

मामाचे होते; पण काळाच्या ओघात ते आता हरवले आहे. वरचेवर वाढणारी महागाईही एकप्रकारे त्याला कारणीभूत आहे. स्पर्धेच्या युगात व यांत्रिकीकरणाच्या जमान्यात मामाचा गाव लोप पावत चालला आहे, ही खरी वास्तविकता आहे. मामाच्या गावाची धमाल,गावातील ग्रामीण खेळ, मौजमस्ती, आंबा, चिंचा, कैरी, आवळे, जांभूळ आदी गावरान मेव्यावर ताव मारणे, बैलगाडीचा प्रवास या सर्व घटना आता कथा–कादंबऱ्यांतूनच मुलांना ऐकाव्या, वाचाव्या लागणार आहेत.त्यामुळे ग्रामीण जीवनाच्या आनंदाला मात्र मुले मुकत आहेत. पूर्वी उन्हाळी सुट्या लागल्या की, मामाच्या गावाला बच्चेकंपनी बैलगाडीतून फिरत असे. परंतु काळाच्या ओघात बैलगाडीही स्वप्नवत झाली आहे. एकत्रितरीत्या जेवण झाल्यावर आजी आजोबा गोष्टी सांगत.मामा मामी, आजी आजोबा, मामाची मुले अशी सर्वजण मिळून मंडळी गोंधळ घालत असत. हे चित्र आता दुर्मिळ होत आहे.मुलांचे बालपण हरवतेय : पालक वर्ग दप्तरांचे ओझे वाहणाऱ्या मुलांकडून उन्हाळयाच्या सुट्यांमध्ये नको तितक्या अपेक्षा करीत आहेत. आपली मुले सर्व बाबतीत अपडेट असायला हवीत, यासाठी त्यांच्या वयाचा विचारही न करता त्यांना न पेलणारे कोर्स करायला लावणे, विविध शिबिरांत सहभागी होण्यास लावणे, कॉम्प्युटरच्या जमान्यात मुले मागे पडू नयेत, म्हणून विविध कोर्समध्ये गुंतवून त्यांचे बालपण हिरावून नेत आहेत. एकविसाव्या शतकात वाटचाल करीत असताना मुलांची स्वप्न मात्र हिरावून घेत आहोत, हे पालकांच्या लक्षातही येत नाही.


**आभासी दुनियेत विरला नात्यांचा जिव्हाळा**

सध्या ज्यांची नाळ गावासोबत जोडली आहे. असेच काही मोजकेच कुटुंब मामाच्या गावाचा आणि स्वत:च्या गावाचा आनंद घेत आहेत. अनेकांच्या जीवनात प्रचंड धावपळ वाढली आहे. सोशल मीडियामुळे जबाबदारीचे ओझे झालेले जगणे मुश्किल करून सोडत आहे. या आभासी दुनियेमुळे नातेसंबंधांमध्ये ओलावा राहिलेला नाही. कालच मी व्हिडीओ कॉल करून बोललो. त्यामुळे आता जायची काय गरज? अशा स्वरूपाची एक नवी मानसिकता नात्यांमध्ये येत आहे. पण प्रत्यक्षात आपले गाव सोशल मीडियामुळे दूर दूर जात आहे, अशी प्रतिक्रिया शिक्षक विष्णु घायाळ यांनी दिली.

# वडवणीतील भारतीय स्टेट बँकेच्या एटीएमची सेवा सुरळीत न केल्यास भाजपाचा आंदोलनाचा इशारा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरात असणाऱ्या भारतीय स्टेट बँकेचे एटीएम मध्ये गेल्या अनेक दिवसापासून पैशाचा खडखडाट असून त्यामुळे एटीएम धारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे शहरातील एटीएम हे शोभेच्या वस्तू बनल्याचे दिसून येत आहे. तरी शहरातील सर्व एटीएमची सेवा सुरळीत न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपच्या वतीने तहसीलदार यांना काल सोमवार रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.




भारत सरकार, मोदी सरकार डिजिटल इंडिया व कॅशलेस व्यवहारासाठी प्राधान्य देत आहे बँकेचे सर्व व्यवहार हे डिजिटल व कॅशलेस करण्यासाठी सरकार सक्ती करून प्रगतीचे पावले उचलत असताना याला वडवणी तालुका मात्र अपवाद असल्याचे दिसून येत असून वडवणी शहरात भारतीय स्टेट बँकेची एक शाखा असून यामध्ये हजारो खातेदार असून या खातेदारासाठी व एटीएम धारकांसाठी वडवणी शहरात बँकेच्या शाखेजवळ एक हायवे रोड येथे एक व चिंचवण रोड येथील एक असे तीन एटीएम मशीन असून या एटीएम मशीन म्हणजे वडवणी करांना असून अडचण नसून खोळंबा अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे.

यामध्ये भारतीय स्टेट बँक ही एटीएम धारकांना एटीएम वापरण्यासाठी बँक धारकाच्या खात्यातून पैसे कपात करत असते परंतु गेल्या दहा पंधरा दिवसापासून या तीनही एटीएम महाराष्ट्र शासन मध्ये पैशाचा खडखडाट असून एखाद्या एटीएम मध्ये थोडे फार पैसे येतात व ते लगेच संपतात त्यामुळे एटीएम धारक हा उघडे एटीएम पाहून आत मध्ये जातो परंतु एटीएम मध्ये पैसे नसल्यामुळे कार्डधारकांना निराशा पोटी परत जावे लागत आहे तसेच एटीएम मध्ये नेट, एसी, विद्युत सेवा सुरू नसते, एटीएम मध्ये स्वच्छता नसते त्यामुळे भारतीय स्टेट बँक एटीएम धारकांना व्यवस्थित सुरळीत सेवा देत नसल्यामुळे एटीएम धारकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

तरी भारतीय स्टेट बँकेच्या वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ याविषयी लक्ष देऊन एटीएम धारकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी एटीएम मधून दररोज पैसे उपलब्ध करून द्यावेत व सेवा सुरळीत करावी नसता भाजपचे वतीने, कार्ड धारकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तहसीलदार यांना काल सोमवार रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे भाजपचे नेते संजय भाऊ आंधळे, महादेव सावंत भाजपा वडवणी तालुका उपाध्यक्ष, युवा नेते बाल- ासाहेब मायकर, संजय नेमटे, वचिष्ट सवासे इत्यादींनी दिला आहे. या लेखी निवेदनाच्या प्रति मा. ना. पंकजाताई मुंडे पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य, माजी खा. डॉ. प्रीतम ताई मुंडे, हंसराज अहिर ओबीसी मागासवर्गीय आयोग राष्ट्रीय अध्यक्ष यांना हि देण्यात आले आहेत.

# बिंदुसरेच्या पुरेषेतील अतिक्रमण काढण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री शिंदे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

## शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी निदर्शनास आणून दिली बीडमधील गंभिर परिस्थिती

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातून जाणाऱ्या बिंदुसरा नदीपात्रात पुरेषेचे उल्लंघन करुन अतिक्रमण करण्यात आले आहे. यामुळे पावसात नदीला पुर आल्यानंतर मोठा धोका निर्माण होऊन जीवित हाणी होऊ शकते. ही गंभीर बाब शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून बिंदुसरा नदी लगतची पूरेषेतील अतिक्रमणे काढण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. मुळूक यांच्या प्रयत्नामुळे बिंदुसरा नदीपात्र मोकळा श्वास घेईल आणि संभाव्य धोका टळणार आहे.



बीड शहराच्या हद्दीतून बिंदुसरा नदीपात्रातून ६ किलोमीटरचा प्रवाह वाहतो. पुरपरिस्थितीच्या काळात अनुचित घटना घडू नये या करीता पुरेषेच्या आत अतिक्रमण करण्यास बंदी आहे. मात्र बिंदुसरा नदीपात्रात पुरेषेच्या आत बेकायदेशीर अतिक्रमण करून जागा ताब्यात घेण्याचा प्रकार सर्रास सुरु आहे. पावसाळ्यात बिंदुसरा प्रकल्प ओव्हर फ्लो झाल्यानंतर सर्व पाणी बीड शहरातून जाते. मुसळधार पावसामुळे बिंदुसरेला पुर आल्याच्या घटनाही घडल्या आहेत. मात्र सध्या सहा किलोमीटर अंतराच्या या नदीपात्रातील पुर रेषेच्या आत नागरिकांनी अतिक्रमण केले असून ते धोकादायक आहे. पूरेषेच्या आत अतिक्रमण करणे हे कायदेशीरदृष्ट्या चुकीचे आहे. पावसाळा तोंडावर असून जोराचा पाऊस झाल्यावर बिंदुसरेला पुर येऊन मोठा धोका निर्माण होऊन जीवित हाणी होऊ शकते. ही गंभिर परिस्थिती मुळूक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिली.

पावसाळ्याच्या अनुषंगाने संभाव्य धोका लक्षात घेऊन बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्राची भूमिअभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन पुरेषेच्या आतील अतिक्रमण काढण्यासंदर्भात जिल्हाधिकारी बीड यांना आदेशित करावे अशी मागणी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी निवेदनाद्वारे केली. निवदेनाची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून बिंदुसरा नदी लगतची पूररेषेतील अतिक्रमणे काढण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

# कै. बाळशास्त्री जांभेकर विद्यालयाचा १००% निकालाची कायम परंपरा

कडा । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील केरूळ येथील कै.बाळशास्त्री जांभेकर विद्यालयात दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून ही निकालाची परंपरा कायम राखण्यात विद्यालयाला यश आले आहे. ३७ पैकी ३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम क्रमांक कुमारी शिंदे ऋतुजा राजेंद्र ९४.४०%, द्वितीय क्रमांक कुमारी शेख अलिशा असलम ९३.६०%, द्वितीय क्रमांक कुमारी शेख खुशी समीर ९३.६०%, तृतीय क्रमांक कुमारी व्यवहारे प्रगती प्रवीण ९२.४०%. ९०% पेक्षा जास्त गुण घेतले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेच्या, ग्रामस्थाच्या वतीने अभिनंदन होत आहे.



सहकारी मित्र सचिन भाऊ अलगट यांना वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा

# आझाद मैदान मुंबई येथील आजच्या आयोजित मोर्चास हजारोच्या संख्येने उपस्थीत राहा : कपिल आवाड


बीड । प्रतिनिधी



सकल मातंग समाजाच्या वतीने विविध मागण्यासाठी आझाद मैदान मुंबई येथे आज मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जातीचे आरक्षण अ ब क ड वर्गीकरण करण्यात यावे. या प्रमुख मागणीसह ईतर मागन्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष मिलिंद नाना आवाड यांच्या आदेशानुसार मानवी हक्क अभियान संघटनेचा या मोर्चास जाहीर पाठिंबा आहे. तरी मानवी हक्क अभियाननच्या शिलेदारांना व बीड जिल्ह्यातील समाज बांधवांना शिलेदारांना विनंती आहे की यांनी जास्तीत जास्त संख्येने या मोर्चास हजर राहावे, असे आवाहन मानवी हक्क अभियानचे युवा नेते कपिल आवाड यांनी केले आहे.

# विठ्ठल गडकर यांचे दुखद निधन

आष्टी । प्रतिनिधी



तालुक्यातील पिंपरी घाटा येथील सामाजिक कार्यकर्ते व सतत सर्वसामान्यांच्या सुखदु:खात सहभागी असणारे एक आदर्श व्यक्तिमत्व विठ्ठल महादेव गडकर यां वय (५६) वर्ष नुकतीच दु:खद निधन झाले त्यांच्या जाण्याने घाटा पिंपरी परिसरात शोककुळ वातावरण निर्माण झाले त्यांच्या पार्थिवावर पिंपरी येथील मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले एक मुलगी पत्नी असा परिवार आह त्यांचा अंत्यविधी गुरुवार २९ रोजी पिंपरी हनुमान मंदिर या समोरील प्रांगणात होणार आहे.

# प्राचार्य के.अभिलाष यांची सीबीएसई बोर्ड तर्फे उप जिल्हा प्रशिक्षण समन्वयक पदी निवड

कडा । प्रतिनिधी

सी बी एस ई पुणे विभागीय कार्यालयाकडून दिनांक १९ मे २०२५ रोजी पत्राद्वारे माहिती देण्यात आलेली आहे की, कडा येथील वर्धमान महावीर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूल चे प्राचार्य के. अभिलाष यांची सीबीएसई बोर्ड तर्फे उप जिल्हा प्रशिक्षण समन्वयक पदी निवड करण्यात आली आहे.



त्याच बरोबर सिंदफनाचे प्राचार्य अन्वर शेख यांचीही जिल्हा प्रशिक्षण समन्वयक पदी निवड करण्यात आलेली आहे. या दोन्ही शिक्षणतज्ञाच्या निवडीमुळे जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात नव चैतन्य निर्माण झालेले आहे. पुणे सी बी एस ई बोर्डाच्या केंद्र प्रमुख/उप सचिव डॉ. मृदुला सिंह यांनी पाठवलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की दोन्हीं प्राचार्यांची पात्रता, अनुभव आणि कौशल्य या पदासाठी अतिशय योग्य आहे. त्यामुळेच त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. यांच्या मार्फत बीड जिल्ह्यातील सी बी एस ई बोर्ड संलग्न शाळांच्या शैक्षणिक विकासासाठी आणि गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षण आयोजित करणे त्याचबरोबर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीमध्ये सहकार्य करण्याची जबाबदारी यांच्यावर सोपवण्यात आलेली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष-श्री अमितजी राठोड, उपाध्यक्ष-श्री संदिपजी चानोदीया, सचिव-श्री हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष डॉ. प्रमोदजी भळगट, श्री मनीषजी गांधी, श्री प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री अमोलजी पटवा, श्री संजयजी पितळे, श्री संतोषजी गांधी, सल्लागार पी. जी. मेहेर सर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग यांच्या सह शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन केले.




# दहशतवादाचा बुरखा फाडू : विश्वशांतीसाठी लढू

## २१ मे : दहशतवाद विरोधी दिन - संकल्प करू दहशत वादाचा खात्मा करण्याचा

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथील भ्याड हल्ला कोणीही सच्चा भारतीय विसरू शकत नाही. २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रनांनी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी अड्डे नष्ट केले. माजी पंतप्रधान स्वर्गवासी राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षी २१ मे रोजी दहशतवाद विरोधी दिन पाळला जातो. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूमधील श्रीपेरुंबदूर येथे प्रचार करत असताना एलटीटीईच्या दहशतवाद्यांनी त्यांची हत्या केली. वयाच्या ४० व्या वर्षी शपथ घेतल्यानंतर राजीव गांधी भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान बनले. १९८४ मध्ये इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर त्यांनी देशाचे सहावे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला. त्यांनी १९८४ ते १९८९ पर्यंत सेवा बजावली.



त्या दिवशी काय झाले : २१ मे १९९१ रोजी राजीव गांधी एका रॅलीत सहभागी होण्यासाठी तामिळनाडूमधील श्रीपेरुंबदूर येथे गेले. त्यांच्यासमोर एक महिला आली जी लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलम या दहशतवादी गटाची सदस्य होती. तिच्या कपड्यांखाली स्फोटकं होती आणि ती पंतप्रधानांकडे गेली आणि म्हणाली की तिला त्याच्या पायांना स्पर्श करायचा आहे . तिने पायाला स्पर्श करताच अचानक बॉम्बचा स्फोट झाला, त्यात पंतप्रधान आणि २५ जण जागीच ठार झाले.

दहशतवाद विरोधी दिन साजरा करण्यामागील उद्दिष्टे काय आहेत : शांती आणि मानवतेचा संदेश पसरवण्यासाठी दहशतवादी गटांबद्दल आणि ते दहशतवादी हल्ला करण्याच्या योजनांबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढवणे. लोकांमध्ये एकतेचे बीज पेरून लोकांमध्ये एकता वाढवणे तसेच, तरुणांना शिक्षण आणि प्रशिक्षण देणे. दहशतवाद, हिंसाचाराचा धोका आणि लोकांवर, समाजावर आणि संपूर्ण देशावर त्याचा धोकादायक परिणाम याबद्दल देशात जागरूकता निर्माण करणे.

दहशतवाद विरोधी दिवसाचे महत्त्व : शांतता आणि सौहार्द वाढवण्यासाठी दहशतवाद विरोधी दिन साजरा केला जातो. दहशतवाद्यांना निष्पाप लोकांचा विध्वंस करण्याची गरज वाटते कारण त्यांचे ब्रेनवॉश केले जाते, ते त्यांच्या धार्मिक हेतूसाठी किंवा त्यांना विवेक भ्रष्ट झाल्यामुळे ते मानतात. त्यांची प्रेरणा काहीही असली तरी त्यांची कामे अनैतिक आहेत हे नाकारता येणार नाही. हा दिवस आपल्याला हजारो सैनिक आणि पोलीस कर्मचार्यांनी आपल्या देशाचे आणि त्यांच्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी दहशतवादाविरुद्ध लढलेल्या बलिदानाचे स्मरण करण्यास मदत करतो.

दहशतवाद विरोधी दिनानिमित्त ही शपथ घेतली जाते : आम्ही भारतातील लोक, आपल्या देशाच्या अहिंसा आणि सहिष्णुतेच्या परंपरेवर दृढ विश्वास ठेवत, आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवाद आणि हिंसाचाराला तोंड देत खंबीरपणे उभे राहू, अशी शपथ घेतो. लोकांमध्ये शांतता, सामाजिक एकोपा आणि समजूतदारपणा राखण्याची आणि मानवी जीवनमूल्यांना धोका निर्माण करणाऱ्या विघटनकारी शक्तींविरुद्ध लढण्याची शपथ घेण्यात येते.

हा दिवस कसा साजरा केला जातो : माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे दहशतवाद विरोधी दिनाच्या दिवशी निधन झाले, त्यामुळे या दिवशी अनेक ठिकाणी त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येते. दहशतवाद आणि त्याचे दुष्परिणाम अधोरेखित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दिवशी रॅली काढून लोकांना जागृतीही केली जाते.

काही ऐतिहासिक दहशतवादी हल्ले : आजवर जगात अनेक दहशतवादी हल्ले झाले आहेत. त्यापैकी काही खालीलप्रमाणे :

१) अमेरिका, ११ सप्टेंबर २००१ चा हल्ला - ११ सप्टेंबर रोजी झालेल्या हल्ल्यात सर्व दहशतवादी हल्ल्यांच्या मालिकेच्या रूपात अल-कायदाने अमेरिकेवर लक्ष केंद्रित केले होते. मंगळवारी, ११ सप्टेंबर २००१ रोजी झालेल्या हल्ल्यांमध्ये अंदाजे २९९६ लोक ठार, ६००० हून अधिक जखमी आणि १० अब्ज डॉलर्सहून अधिक किंमतीची संपत्ती व पायाभूत सुविधा नष्ट झाल्या.

२) भारतीय संसदेवर हल्ला, १४ डिसेंबर २००१ भारतीय संसदेत १३ डिसेंबर २००१ च्या हिवाळी अधिवेशन सुरू असताना सकाळी अकरा वाजता पांढऱ्या राजदूताच्या कारमधून आलेल्या पाच सशस्त्र हल्लेखोरांनी संसदेवर गोळीबार केला. त्यानंतर झालेल्या प्रतिहल्ल्यात सर्व हल्लेखोर मरण पावले.

३) मुंबई दहशतवादी हल्ला, २६- २९ नोव्हेंबर २००८ ठिकाण - छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशन, लिओपोल्ड कॅफे, ताजमहाल पॅलेस आणि टॉवर हॉटेल, ओबेरॉय ट्रायडंट हॉटेल, मेट्रो सिनेमा, कामा आणि अल्बस हॉस्पिटल आणि नरिमन हाऊस. मुंबईत लष्कर-ए-तैयबा या अतिरेकी संघटनेशी संबंधित असलेल्या दहा पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हल्ला करत १४४ माणसे ठार मारली. या हल्ल्यात नऊ बंदूकधारी ठार झाले आणि त्यातून एक जणाला पकडण्यात यश आले होते. नोव्हेंबर २०१२ मध्ये अंतिम बंदूकधारक मोहम्मद अजमल कसाब याला फाशी देण्यात आली.

म्हणूनच, दहशतवाद विरोधी दिन हा संताप व्यक्त करतो आणि मानवतेशी एकता दर्शवितो. दहशतवाद म्हणजे दहशतवाद्यांच्या भयानक कृत्यांमुळे लोकांमध्ये जीवितहानी आणि मृत्यूची भीती निर्माण करण्याचे कृत्य आहे. यात शंका नाही की हा मानवांच्या हक्कांवर हल्ला आहे. म्हणून, आपण एकत्र येऊन प्रेम, काळजी इत्यादी पसरवून ते संपवले पाहिजे.



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
तहसीलदार, बीड

दहशतवाद्यांना कोणताही धर्म नसतो. त्यांना फक्त विनाशाची भाषा समजते असे म्हटले जाते ते बरोबर आहे.

राष्ट्रीय दहशतवाद विरोधी दिन हा भारतातील एक महत्त्वाचा दिवस आहे, लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सतर्क आणि सावध राहण्याचे आवाहन केले जाते. लोकांना त्यांच्यातील मतभेदांकडे दुर्लक्ष करून आणि सुसंवादीपणे सहअस्तित्वात राहण्यास प्रोत्साहित करून शांतता प्रस्थापित करतो. समाज शांत ठेवणे किती महत्त्वाचे आहे याची जाणीव करून देतो.

२१ मे हा अंतरराष्ट्रीय चहा दिवस देखील आहे : चहा हे केवळ लोकप्रिय पेय नाही तर अनेक समाजातील सामाजिक चालीरीती, समारंभ आणि आदरातिथ्य यामध्येही महत्त्वाची भूमिका बजावते . चहा उद्योग हा जगभरातील लाखो लोकांच्या उपजीविकेचा प्रमुख स्त्रोत आहे, विशेषत: चहा उत्पादक भागात. आंतरराष्ट्रीय चहा दिनाचे चहा क्षेत्राचे आर्थिक मूल्य ओळखणे आणि शाश्वत चहा उत्पादन आणि न्याय्य व्यापार पद्धतींना प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट आहे.

पहिला आंतरराष्ट्रीय चहा दिवस २००५ मध्ये भारताची राजधानी नवी दिल्ली येथे साजरा करण्यात आला आणि नंतर इतर चहा उत्पादक देशांमध्ये - श्रीलंका, नेपाळ, व्हिएतनाम, इंडोनेशिया, बांगलादेश, केनिया, मलावी, मलेशिया, युगांडा आणि टांझानिया येथे साजरा करण्यात आला. हिरवा आणि हर्बल चहा हा अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोकेमिकल्सने समृद्ध असतो. एकूण आरोग्यावर आणि आरोग्यावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

# एस पी नवनीत कॉवताचा गुटखा माफियांना आणखी एक दणका

## बीड एलसीबीची मोठी कारवाई; छापा टाकुन तब्बल ४० लाख ३१ हजाराचा गुटखा व साहित्य पकडून एक इसमाविरुध्द केला गुन्हा दाखल

गेवराई । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक, नवनीत कॉवत साहेब यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था.गु.शा. बीड यांनी अवैध धंद्याचे समुळ उच्चाटन करण्यासाठी अवैध धंद्ये करणारांची गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत. त्यावरुन दिनांक २०/०५/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि सुशांत सुतळे, पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे गेवराई हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, मौजे पांढरवाडी, ता. गेवराई येथे इसम नामे दादासाहेब अंकुश जाधव हा त्याचे घरामध्ये मोठयाप्रमाणात गुटखा, पानमसाला साठवुन ठेवलेला आहे. तेव्हा सदरची



माहिती तात्काळ पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख यांना कळवुन त्यांनी त्वरीत कारवाई करण्याचे आदेश पोउपनि सुशांत सुतळे यांचे पथकांना दिले. त्यानंतर स्थागुशा पथकाने खबरी ठिकाण पांढरवाडी येथील इसम नामे दादासाहेब अंकुश जाधव रा. पांढरवाडी याचे राहते घरी छापा टाकला असता तो मिळुन आला व त्याचे घराचे झडतीमध्ये त्याने स्वतः:चे फायद्यासाठी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत स्वादिष्ठ पानमसाला, तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थ वर बंदी असतांना देखील विनापरवाना, बेकायदेशीररित्या घरामध्ये व त्याचे मालकीचे बोलेरो पिकअप, स्विप्ट डिझायर वाहनामध्ये गुटखा, पानमसाला, तंबाखु जन्य पदार्थाचा एकुण ४०,३१,६००/- रु चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आलेला आहे.

आरोपीने काही गुटखा जन्य पदार्थ कर्नाटक राज्यातुन व काही इंदुर (राज्य मध्यप्रदेश) येथुन आणल्याचे निष्पन्न झालेले असुन त्यात दोन आरोपींचे नावे निष्पन्न करण्यात आलेली आहे. आरोपीस पोलीस स्टेशन येथे हजर करुन त्याचे विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १२३,२२३,२७४,२७५, ३(५) अन्वये पोउपनि सुशांत सुतळे स्थागुशा, बीड यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली आहे.

सदरची कामगिरी नवनित कॉवत पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि उस्मान शेख स्था.गु.शा. बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, पोह/विष्णु सानप, राजु पठाण, राहुल शिंदे, विकास राठोड, मनोज वाघ, कैलास ठोंबरे, विकास वाघमारे, चालक नितीन वडमारे व चालक सुनिल राठोड यांनी मिळुन केलेली आहे.

### वेलडन नवनीत कॉवत साहेब



बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यामुळे माफी यार आता बिळामध्ये जाऊन बसले आहेत नवनीत कामत यांच्या कारवाईने बीड जिल्ह्यातील जनता त्यांचा कौतुक करत आहे असा एसपी पुन्हा होणे नाही नवनीत काम त्यांनी गुटका मटका दारू पत्त्याचे क्लब हे सर्व माफीयांना आदर घडविण्याचा विडा उचलला आहे नवनीत का व त्यांच्या सिंघम कारवायाने अनेक माफियांचे धाबे दणाणले आहेत का माफी आणि चाळीस लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला व कारवाई केली बीड जिल्ह्यातील जनतेकडून एसपी नवनीत कॉवत यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

# पहाडी दहीफळ येथील शेतकरी पिण्याच्या पाण्यासाठी करतोय जिवाची कसरत

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी दहीफळ येथिल शेतकरी परमेश्वर शिंपले गेली तिन वर्ष महाविरण कर्मचारी यांना विनंती करतायत विज जोडून द्या पैसैही भरलेत परंतू मोठया लोकांच्या दिमतीला असणारे कर्मचारी, अधिकारी रोज उडवा उडवीचे उत्तरे देत आहेत. दोन पोलवरील विज जोडणी गेली दोन वर्ष जोडू शकले नाही. या शेतकऱ्यांने जलसमाधीचाही ईशारा दिला पण अधिकारी लोकांना घाम फुटत नाही. यावरून दिसून येते गरीबाचा वाली कोणी नाही. महावितरण कार्यालयात गेले असता तुम्ही गावाकडे जा आम्ही माणस पाठवून देतो हेच उत्तर गेली दोन वर्ष झाली मिळत असल्याचे शेतकऱ्यांने सांगितले. शेतीसाठी तर पाणी मिळतच नाही पण पिण्याच्या पाण्यासाठी सुद्धा जोखीम घ्यावी लागत असून आता न्याय मागायचा कोणाकडे अशी आर्त भावना शेतकरी व्यक्त करत आहे.





पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या परळी तालुक्यात बौद्ध समाजावर अन्याय

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानीसाठी महिलांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु

परळी । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री नामदार पंकजाताई मुंडे तसेच माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या परळी तालुक्यात बौद्ध समाजावर अन्याय होताना दिसून येत आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व बहुजन समाजाचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कमान उभारण्यासाठी परवानगी द्यावी या मागणीसाठी आज दि.२० मे पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बौद्ध समाजाच्या वतीने महिला, लेकरा बाळासह उपोषण सुरू करण्यात आले आहे. दरम्यान बीड शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या वतीने पाच उपोषणकर्त्यांना परवानगी दिली असून भारतीय न्याय संहिता २०२३ कलम १६८ नुसार नोटीसही दिली आहे.

याबाबत परळी तालुक्यातील दौनापूर येथील बौद्ध समाजाने बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. या निवेदनात म्हंटले होते की, दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी दौनापूर येथील बौद्ध समाजाच्या वतीने ग्रामपंचायतीला बौद्ध वस्ती समोरील रस्त्यावर प्रवेशद्वार अर्थातच कमान उभारण्याची परवानगी मागण्यासाठी अर्ज केला. त्यावर ग्रामपंचायतीने परवानगी तर दिलीच नाही. उलट सरपंच राजेभाऊ प्रभाकर आघाव यांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेतला. ठरावाद्वारे कमानीला परवानगी देण्यात येणार नाही असे सांगितले होते. त्यानंतर दौनापूर येथील बौद्ध समाजाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेशद्वार, (कमान) करण्याची परवानगी द्यावी अन्यथा २० मे २०२५ पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता.

दिलेल्या निवेदनानुसार वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे तसेच उपोषण कर्ते रामचंद्र भगवान घाडगे, चंद्रमुनी रामकिशन घाडगे, रामचंद्र दिलीप बनसोडे, हरिभाऊ साधू घाडगे, किशन अच्युत घाडगे यांच्यासह रोहिदास घाडगे, लक्ष्मण घाडगे, नागुराव गायकवाड, दिलीप बनसोडे, कोंडीराम घाडगे, कमलाकर घाडगे, ॲड. विवेक वैद्य, धनंजय घाडगे, दीपक बनसोडे, सुजित घाडगे, फुलचंद घाडगे, सचिन घाडगे, महेंद्र घाडगे, छगन घाडगे, कालिंदा घाडगे, रेखा घाडगे, कावेराबाई घाडगे, वैजयंती घाडगे, मोहिनी घाडगे, रेखा बनसोडे, मंदाबाई वाव्हळे आदी उपोषणाला बसले आहेत. दरम्यान या उपोषणावर जिल्हा प्रशासन तसेच उपोषण सोडविण्यासाठी आणि कमानीला परवानगी द्यावी यासाठी पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे तसेच आमदार धनंजय मुंडे हे काय भूमिका घेतात याकडेही जिल्ह्यातील बौद्ध समाजाचे लक्ष लागले आहे.

# ना. छगनरावजी भुजबळ यांच्या निवडीचा बीडमध्ये जल्लोषात आनंदोत्सव साजरा

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल बीड शहरांमध्ये या निवडीचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. समता परिषदेसह ओबीसी समाजातील विविध संघटनांनी एकत्रित येत फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांना भाजपा महायुतीच्या सरकारने उशिरा का होईना मंत्रिमंडळात समाविष्ट करून घेतल्याने संपूर्ण देशभरात समता परिषदेसह ओबीसी समाजामध्ये आनंद निर्माण झाला आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस,



उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे राज्यातील ओबीसी समाजाने आभार व्यक्त केले असून बीडमध्ये समता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि समता परिषदेचे राज्य सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. बीड शहरातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळ बुधवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते, ओबीसी समाजातील विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी एकत्रित येऊन ढोल ताशांच्या गजरात फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

याप्रसंगी ओबीसी समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते नामदेवराव दुधाळ, परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, सोनार समाजाचे नेते ॲड. संदीप बेदरे, माळी महासंघाचे ज्येष्ठ नेते प्रा. लक्ष्मणराव गुंजाळ, भाजपाच्या नेत्या संजीवनीताई राऊत, माजलगावचे समता परिषदेचे नेते संतोष रासवे, मोहनराव गोरे, संतराम पानखडे, दिनकर जमदाडे, बाबासाहेब दुधाळ, विठ्ठल भराटे, अशोक भानुसे, बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये, नारायणराव शिंदे, समता परिषदेचे युवा नेते संदीप दुधाळ, अजय राऊत, सार्वजनिक जयंती महोत्सवाचे माजी अध्यक्ष तुषार दोडके, समीर राऊत, महादेव आढाव, मच्छिंद्र आढाव, दत्ता लव्हाळे, जगन खेत्रे, अशोक रासवे, महेश व्यवहारे, स्वप्निल शिंदे, महेश चौधरी, गोटू साखरे, अमोल राऊत, ह. भ. प. खरमाटे महाराज, रवी काळे यांच्यासह मोठ्या संख्येने ओबीसी समाज बांधव उपस्थित होते.

समाजसेवक सातिराम ढोले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद

# रुग्णांच्या सेवेत नवीन ॲम्बुलन्स सेवा सुरू, वाढदिवसानिमित्त आदर्श उपक्रम

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालय बीड येथे समाजसेवक सातीराम आण्णा ढोले यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर शासकीय रुग्णालय बीड येथे आयोजित केले होते. छत्रपती शिवाजी महाराज व लोकनेते विनायकरावजी मेटे यांच्या प्रतिमेचे पूजन शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष कोलंगडे आप्पा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, बीड शहर उपाध्यक्ष शेषराव तांबे, हरिश्चंद्र ठोसर प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड संस्थापक अध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते युवक तरुणांनी रक्तदान करुन रक्ताचा तुटवडा भरून काढण्यास मदत केली त्या बदल विशेष आभार.सिविल सर्जन डॉ.संजय राऊत सर यांनी मानले. या प्रसंगी उपस्थित जिल्हा रुग्णालय सिविल सर्जन डॉ.संजय राऊत सर, स्वप्निल भैय्या गलधर, महादेव नाना मातकर, नोडल ऑफिसर डॉ.पारखे सर, नितिन भैय्या धांडे, अशोक खरसाडे, उपजिल्हाप्रमुख रुग्णसेवक शरद झोडगे, समाजसेवक प्रवीण पालीमकर सर,युवा पत्रकार अंकुश गवळी, अजय जाधव, मच्छिंद्र वाणी, कल्याण ढोले, दत्ता मामा गलधर, बप्पा ढोले, नामदेव ढोले, सचिन ढोले, चैतन्य जाधव, अशोक वाणी,तानाजी काळे, सुशिल कांबळे, प्रकाश तावरे, शंशाक धन्वे, सौरभ मुंडे, संतोष जोगदंड, ऋषिकेश ढोले, सोनु ढोले, सोनु जाधव, भरत वाणी, अशोक दातवासे, सचिन तेलप व आदी उपस्थितीत. रक्तदान शिबीर समाज उपयोगी कार्याने पारपडले व नवीन म्बुलन्स चे उद्घाटन मार्गदर्शक सुशिल खटोड व गणेश माने सर व सातिराम आणा ढोले पाटील हस्ते व रयत सामाजिक प्रतिष्ठान व सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड वतीने करण्यात आले व रुग्णांच्या सेवेत ॲम्बुलन्स सुरू करण्यात आली.




राज्य सरकारने तातडीने नर्सिंग रिक्त पदभरती करून वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेला बळकट करावे

# राज्यात २० हजार नर्सिंग पदे रिक्त : खेडकर, मोरे

बीड । प्रतिनिधी

बीड सह राज्यातील आरोग्य व्यवस्था सध्या गंभीर संकटात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र जिल्हा व ग्रामीण रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये परिचारिकांची मोठी कमतरता निर्माण झाली आहे. सध्या राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये नरसिंगच्या तब्बल २०,६६३ पदावर भरतीच नाही असे स्पष्ट झाले आहे. परिचारिकांवर सध्या २० ते २५ रुग्णांची जबाबदारी असून त्यामुळे रुग्णसेवेची गुणवत्ता घसरली आहे.

विशेष म्हणजे परिचारिका व्यवस्थापना पाहणाऱ्या मॅट्रन आणि असिस्टंट मॅटरची ८० टक्के पदेही रिक्त आहेत यामुळे परिचारिका वर कामाचा अतिरिक्ततान असून रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी वाद होण्याची घटनाही वाढल्या आहेत अशी माहिती शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांच्याकडे महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या सचिव सुमित्रा थेटे यांनी दिलेल्या राज्य शासनाने अलीकडचे दहा नवीन वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालय सुरू केली असली तरी त्यांच्यासाठी आवश्यक नर्सिंग पदे अद्याप तयार करण्यात आलेली नाहीत. या नवीन रुग्णालयांमध्ये देखील नरसिंग मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे कार्यक्षमता प्रभावित होत आहे. या सरकार माय बाप ने जर नर्सिंग रिक्त पदे भरली तर आज जवळपास २० ते ३० हजार मुलींच्या रोजगारांचा प्रश्न मिटेल आणि बरेच कुटुंब देखील सुखी होतील पेशंटला व्यवस्थित सुख सुविधा देता येतील म्हणून या



सरकारने लवकरात लवकर नरसिंग रिक्त पदे ही पदभरती तात्काळ करण्यात यावी नसता शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर व शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांच्या वतीने शिरूर कासार येथील जिजामाता चौकामध्ये निदर्शनांदोलन करूत, असे त्यांनी सांगितले.

**वैद्यकीय सेवावर गंभीर परिणाम; कॅग अहवालातही खुलासा**

२० /२४ मध्ये सादर झालेल्या कॅग भारतीय नियंत्रक आणि महालेखा परीक्षक च्या अहवालात म्हटले आहे की, राज्यातील प्राथमिक व दुय्यम आरोग्य सेवांमध्ये ३५ टक्के मनुष्यबळाची कमतरता आहे. महिलांच्या रुग्णालयांमध्ये ही कमतरता आणखीन तीव्र आहे. आयुष्य आणि टर्म केअर केंद्रामध्येही टक्केवारी अनुक्रमे ५ टक्के आणि ४ टक्के इतकी आहे. सध्या सरकारी रुग्णालयात ७० टक्के रुग्णांना भरती करावे लागते. त्यामुळे परिचारिकांच्या अनुपस्थितीत रुग्णसेवेवर प्रत्यक्ष परिणाम होत आहे.

तज्ञांची मागणी आहे की राज्य सरकारने तातडीने रिक्त पदावर भरती करून वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेला बळकट करावे नसता शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र स्वरूपाचा आंदोलन करण्यात येणार आहे.

# गाव खेड्यासह शहरात उभारलेले विनापरवाना चौक ठरताहेत वादाचे कारण!

आष्टी । प्रतिनिधी

गाव, खेड्यासह शहरात व राज्य महामार्गावर महापुरूषाच्या नावाचे विनापरवाना चौक अनेक ठिकाणी उभारण्यात आले आहेत. याच चौकात स्तंभ लावून वेगवेगळे झेंडे लावण्यात आली आहेत. पण आता हेच चौक सामाजिक सलोखा बिघडवताना दिसत आहेत. एवढेच नव्हे तर वादाचे कारण देखील ठरत असल्याचे आष्टी तालुक्यातील खडकत येथील घटनेवरून समोर आले आहे.



आष्टी तालुक्यातील अनेक गावासह, खेड्यापाड्यात त्याच बरोबर राज्य महामार्गावर प्रशासनाची कसलीही परवानगी न घेता महापुरूषांच्या नावाचे चौक उभारले आहेत. तर अनेक ठिकाणी वेगवेगळे झेंडे उभा केले आहेत. वास्तविक हे चौक किंवा स्तभ उभारून झेंडा लावताना प्रशासनाची रितसर परवानगी घेणे अपेक्षित असताना एकाही ठिकाणी अशी परवानगी न घेता रातोरात चौक उभारून त्याला महापुरूषाचे नाव दिले गेले आहे. पण हेच चौक आता आपापसात वादंगाचे कारण ठरत असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करत आहेत. नुकत्याच आष्टी तालुक्यातील खडकत येथील एका घटनेवरून हा प्रकार समोर आला असुन यातून सामाजिक सलोखा राखण्या ऐवजी बिघडत चालला आहे. प्रशासनाने अश्या सर्व ठिकाणची पाहणी करून सामाजिक सलोखा राखला जावा यासाठी विनापरवाना उभारलेले चौक हटविण्यात यावेत व कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवावी, अशी मागणी होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT